# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचारः एक सामाजिक दृष्टीक्षेप

**शोधपत्र-समाजशास्त्र**

***कु. महानंदा राऊतखेडकर**

सावित्रीबाई फुले या महात्मा जोतीराव फुले यांच्या पत्नी होत्या. पत्नी म्हणून सामाजिक, शैक्षणिक कार्यात त्या कधीच मागे राहिल्या नाहीत तर त्यांच्या बरोबरीने या शैक्षणिक कार्यात त्यांनी सहभाग घेतला होता. म.फुलेंनी जरी स्त्रीशुद्रातीशूद्रांच्या शिक्षणासाठी शाळा स्थापन केल्या तरीही त्यात अंगावर शेणाचा, चिखलाचा, दगडांचा मारा सहन करून शिकविण्याचे कार्य अत्यंत जिद्दीने सावित्रीबाई फुले यांनी केले. म्हणून त्यांच्या शैक्षणिक विचारांचे समाजाच्या व समाजशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व आहे.

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही गावाची, शहराची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामुग्रींचा आधार घेण्यात आला आहे.

**उद्देश :** १) सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांचे अध्ययन करणे. २) सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणविषयक विचार स्त्रीशुद्रातीशूद्रांच्यासाठी पोषक व अत्यंत प्रागतीक स्वरूपाचे आहेत याचे अध्ययन करणे.

**संशोधन आराखडा :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक-विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**व्याप्ती व मर्यादा :** सावित्रीबाई फुले यांच्या लेखनात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा प्रकारचे विचार स्पष्ट होतात. पण या संशोधन निबंधात त्यांचे केवळ शिक्षणविषयक विचारांचेच अध्ययन केले आहे. सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणविषयक विचार पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

'काव्यफुले' काव्यसग्रंहाच्या प्रास्ताविकात शिक्षणाचे माध्यम, शिक्षणाचे ध्येय व उद्दिष्ट्ये, शिक्षणाची कार्य याविषयी पुढील विचार प्रस्तुत केले आहेत.

"मनोरंजक उपदेश हे ......... गाऊनी
बुद्धिरम्य रम्य आहे ............. गाऊनी
नीतिशिक्षण सुबोध हे ........... गाऊनी
ज्ञान भावना ही पाहे ................ गाऊनी"[१]

सावित्रीबाईंना शिक्षण हे समाजाच्या शेवटच्या खालच्या स्तरापर्यंत पोहचवायचे होते. म्हणून केवळ पाठांतर, घोकमपट्टी, पुस्तकी ज्ञान पोपटपंची व बंदिस्त शिक्षण देऊन चालणार नाही. मनोरंजनातून व्यवहार उपयोगी शिक्षण, बुद्धीचा विकास करणारे, भावनेची व ज्ञानाची जोपासना करणारे, नीतिशिक्षण मनोरंजक करून लोकांना द्यावयाचे होते.

ओवीबद्ध 'शिव प्रार्थनेत' सावित्रीबाई म्हणतात,

"सत्य सुंदर शिव | शिरी शोभे जटाजपळट ||
वाहती गंगाधरा उत्कट | चतुर्दश विद्येच्या ||[२]

वरील ओळीत सावित्रीबाईंची शिवप्रार्थना आहे. तसेच त्यात 'सत्य आणि सुंदर' असा शब्दप्रयोग केला आहे. "सत्य, शिवं, सुंदरम्" हे तीन्ही शब्द आधुनिक शैक्षणिक जीवनामध्ये ब्रीद बनले आहेत.

'काव्यफुले' या ग्रंथामध्ये सावित्रीबाई लिहितात,

"जोतीबांना नमस्कार | मनोभावे करतसे
ज्ञानामृत आम्हां देई | असा जीवन देतसे
थोर ज्योति दीन शूद्र | अतिशूद्र हाक मारी
ज्ञान ही ईर्ष्या देई | तो आम्हाला उद्धारी ||[३]

सावित्रीबाई जोतीबांना मनोभावे नमस्कार करतात. कारण त्यांनी स्त्रीशुद्रातीशूद्रांना सत्याचा, ज्ञानाचा मार्ग दाखविला. त्यांना ज्ञानाचे महत्त्व पटवून सांगितले आहे. पुढे अनुष्टुभात्मक 'शूद्रांचे दुखणे' या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

"दोन हजार वर्षांचे | शूद्रा दुखणे लागले ब्रह्माविहीत सेवेचे |
भू-देवांनी पछाडले ||" [४]

सावित्रीबाई या काव्य पंक्तीत म्हणतात, दोन हजार वर्षांपासून शूद्रातिशूद्रांमागे दुखणे लागले आहे, आजार जडला आहे तो भूदेवांच्या सेवेचा, अज्ञानाचा, अंधकाराचा व मानसिक इच्छा शक्तिंच्या अभावाचा हा आजार वा रोग आहे. सावित्रीबाईंना अपेक्षित असलेले, आवडत असलेले शिक्षण पुढीलप्रमाणे आहे.

"शूद्रांना सांगण्याजोगा | आहे शिक्षण मार्ग ||
शिक्षणाने मनुष्यत्त्व | पशुत्व घटते पहा ||" [५]

शतकानुशतके ब्राह्मणांनी शूद्रांवर गुलामी लादली तेंव्हा ती गुलामी संपवण्यासाठी, शोषणाचा प्रतिकार करण्यासाठी, मनुष्यातील पशुत्त्वाचे अवगुण नष्ट करण्यासाठी व सद्गुणांची प्राप्ती करण्यासाठी एकमेव मार्ग आहे तो म्हणजे शिक्षणमार्ग होय असे सावित्रीबाई म्हणतात. तसेच या विचारांतून त्यांची शुद्रांबद्दलची व ज्ञानाबद्दलची तळमळ दिसते.

* संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड [ महाराष्ट्र ]

विद्या शिकवण्यासाठी वेळ, नियम व नैतिकता सांगतांना सावित्रीबाई 'श्रेष्ठ धन' या अनुष्टुभात्मक काव्यात लिहितात,

"प्रातः काळी करी बाळा | शौचादि मुखमार्जन ||
होऊनिया शुचिर्भूत | वंदू माता पिता जन
स्मरू शंभो गुरू देव | अभ्यासी रमवू मन
घरी जाय दवडू नको | लाभदायी हे दिन ||"(६)

वरील ओळींमध्ये सावित्रीबाईंनी अध्ययनाचे मानसशास्र सांगितले आहे हे नोंद घेण्यासारखे आहे. मनाची एकाग्रता वाढावी म्हणून पहाटेच्या शांत वातावरणात अध्ययन करावे कारण हे वाचलेले दीर्घकाळापर्यंत लक्षात राहते. अशाप्रकारे सावित्रीबाई शैक्षणिक मानसशास्त्रज्ञांचा सिद्धांत सांगतात. अध्ययनात काटेकोर नियोजनावरदेखील भर देतात. अशाप्रकारे सावित्रीबाई या भारतातील पहिल्या स्त्री शैक्षणिक मानसशास्त्रज्ञा होत्या. त्या पुढे म्हणतात,

"अभ्यास करी विद्येचा | विद्येस देव मानून
घे नेटाने तिचा लाभ | मनी एकाग्र होऊन
विद्या हे धन आहे रे | श्रेष्ट साऱ्या धनाहून
तिचा साठा जयापाशी | ज्ञानी तो मानती जन |" (७)

सावित्रीबाई अभ्यासाचा उपदेश करतांना म्हणतात, हे बालका, विद्येला देव-देवी मानून तू सतत अभ्यास कर, भक्ती कर, नेटाने, जिद्दीने, चिकाटीने, मनःपूर्वक व एकाग्रतेने विद्येचा लाभ घे! असे सांगतात. सावित्रीबाई 'बाळास उपदेश' या कवितेत वेळेला, काळाला व कष्टाला विशेष महत्त्व देतात. कामात आळस, दीर्घसूत्रीपणा, व्यसनाधिनता हे शुद्रातिशूद्रांच्या अधोगतीचे मुख्य कारण आहे म्हणून म्हणतात,

"करणे काम आजी ते | आत्ताच कर खेचून
जे दुपारी करायचे | ते आताच कर जाऊन
क्षणानंतरचे काम | या क्षणी कर ठोकनू
झालं काम की नाही | ते पुसे मृत्यु कारण |" (८)

बालमनावर सुसंस्कार, सुविचार, सुसंस्कृती व शिस्त निर्माण करण्यासाठी लहानपणापासूनच योग्य गोष्टी शिकविण्याचे महत्त्व सावित्रीबाई जाणून होत्या हे लक्षात येते. तसेच बालक मंदिरातील शिक्षिका प्रायोगिक मानसशास्त्रातील प्रशिक्षित स्त्री असावी, यावरही त्यांचा भर होता.

'इंग्रजी शिका' या अभंगात्मक काव्यात सावित्रीबाई म्हणतात,

"स्वावलंबनाचा | उद्योग प्रपंच
ज्ञान धन संचय | करी याने ||
विद्येविना गेले | वाया गेले पशू |
स्वस्थ नका बसू | विद्या घेणे || (९)

सावित्रीबाई शिक्षणातून, ज्ञानातून स्वावलंबन, उद्योजगता निर्माण होऊन त्यातून धनाचा, संपत्तीचा संचय करा असे सांगतात. पशू विद्येविना वाया गेले पण मानवाला ही विद्या प्राप्त करण्याची सुवर्णसंधी मिळाली. तेंव्हा ती पटकन मिळवा असे त्या म्हणतात. एकूण शिक्षण व्यवस्थेकडून जीवन शिक्षण, उपयोगात्मक, क्रियावादी, स्वावलंबी व उद्योगी शिक्षणाची अपेक्षा व्यक्त करतात. यातून त्यांचा व्यवहारी, जीवनोपयोगी शिक्षणावर भर होता. तसेच, सावित्रीबाई शूद्र-अतिशूद्र व स्त्रियांना सावित्रीबाई सतत, अविरत विद्याग्रहण करण्याची प्रेरणा देतात, उपदेश करतात.

"शूद्र अतिशूद्र | दुःख निवाराया
इंग्रजी शिकाया | संधि आली ||
इंग्रजी शिकुन | जातिभेद मोडा ||
भटजी भारूडा | फेकुनिया ||" (१०)

सावित्रीबाई म्हणतात इंग्रजांमुळे पाश्चात्त्य विद्या शिकण्याची संधी शूद्रातीशूद्रांना प्राप्त झाली. त्यामुळे त्यांना पाश्चात्त्य स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, समता या विचारांची ओळख होऊन गुलामगिरी विरूद्ध आवाज उठवण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. जातीविरहित समतेवर आधारित समाज निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली. तसेच पूर्वीपेक्षा जाती व्यवस्थांचा प्रभाव निश्चितच कमी झाली. याचे श्रेय सावित्रीबाई फुले शैक्षणिक विचार व कार्यालाच देतात. त्या पुढे म्हणतात,

"मुला बाळांना आपण शिकवू | आपण पण शिकू
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून | नीती धर्मही शिकू ||" (११)

वरील ओळीत सावित्रीबाई म्हणतात, मानवाने स्वतः शिकले पाहिजे, मुलांना शिकवले पाहिजे, विद्या घेऊन स्वतःजवळ जे ज्ञान आहे ते वाढवले पाहिजे. तसेच, त्या पुढे म्हणतात की, 'नीतिधर्म' शिकवणारे शिक्षण शिकावे व शिकवावे. आज भारत सरकारने राबवलेले नैतिक शिक्षण सावित्रीबाईंनी १५० वर्षापूर्वीच आपल्या काव्यपंक्तीतून विशद केले होते.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) संपा.डॉ.माळी मा.गो.- सावित्रीबाई फुले काल आणि कर्तृत्त्व, पृ.६४ २) संपा.डॉ.माळी मा.गो.- सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.३ ३) संपा.डॉ.माळी मा.गो., सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.१७ ४) संपा.डॉ.माळी मा.गो. - सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.११ ५) संपा.डॉ.माळी मा.गो. - सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.७ ६) संपा.डॉ.माळी मा.गो.- सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ. २१ ७) संपा.डॉ.माळी मा.गो.-सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.२० ८) संपा.डॉ.माळी मा.गो.-सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.२ ९) संपा.डॉ.माळी मा.गो.-सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ. २३ १०) संपा.डॉ.माळी मा.गो. - सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.२३ ११) संपा.डॉ.माळी मा.गो.- सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, पृ.२५